राज्यातील महानगरपालिकांमधील (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.१०२/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९.

प्रस्तावना: -

वित्त विभागाच्या दि.३०.०१.२०१९ च्या अधिसूचनेन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत.

७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, न्यायालयातील अन्यायिक कर्मचारी, अनुदानीत शाळेतील कर्मचारी, कृषी व अकृषी विद्यापीठे आणि त्यांना संलग्न अनुदान प्राप्त अशासकीय महाविद्यालयातील कर्मचारी तसेच इतर अनुदान प्राप्त संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहेत. तथापि, राज्यातील महानगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या तरतूदी अद्याप लागू करण्यात आलेल्या नाहीत.

सदर अधिकारी/ कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील महानगरपालिकांमधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

राज्यातील महानगरपालिकांमधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती तसेच, अटी व शर्ती विहित करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

(अ) ७ वा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची कार्यपध्दती:-

१) महानगरपालिका आयुक्तांनी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचे प्रस्ताव महानगरपालिकेच्या महासभेसमोर सादर करावा.

२) महानगरपालिकेच्या महासभेने सदर प्रस्तावाबाबत निर्णय घ्यावा.

३) महानगरपालिकेच्या महासभेने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा ठराव केल्यानंतर, त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव आयुक्तांनी शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

४) सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर, त्यानुसार महानगरपालिकेस त्यांच्या कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करता येईल.

५) ७ व्या वेतन आयोगानुसार थकबाकी अदा करण्याबाबत महानगरपालिकांनी त्यांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन निर्णय घ्यावा.

(ब) ७ वा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत विहित अटी व शर्ती:-

(१) ७ वा वेतन आयोगानुसार निश्चित करण्यात येणाऱ्या वेतनश्रेणी, राज्य शासनाकडील संबंधित समकक्ष पदांना लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेणीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अधिक असणार नाहीत.

(२) वेतनश्रेणीबाबत समकक्षता ठरविताना काही अडचणी आल्यास, त्याचे शासनाच्या पूर्वमान्यतेने निराकरण करण्यात यावे.

(३) ७ व्या वेतन आयोगाचा लाभ केवळ मंजूर पदांवरील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात यावा.

(४) महानगरपालिकांनी शासन निश्चित करेल असा सुधारणा कार्यक्रम राबविणे बंधनकारक असेल.

(५) ७ वा वेतन आयोग लागू करताना केवळ अपवादात्मक बाब म्हणून महानगरपालिकेचा आस्थापना खर्चाची विहीत मर्यादा शिथिल करण्यात आली तरीही महानगरपालिकांनी खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील: -

(अ) महानगरपालिकेतंर्गतची विकास कामे, केंद्र व राज्य शासनाच्या योजनेतील महानगरपालिकेचा हिस्सा, विकास कामांसाठी घेतलेले कर्ज आणि व्याज यांच्या परतफेडीसाठी पुरेसा निधी शिल्लक राहील यांची खात्री करावी.

(आ) संबंधित महानगरपालिकेने उत्पन्नात वाढ करुन, त्यांचा आस्थापना खर्च पुढील ३ वर्षात विहीत मर्यादेत राहील, याबाबत उपाययोजना करणे अनिवार्य असेल.

(इ) ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यामुळे, येणारे अतिरिक्त वित्तीय दायित्व शासनाकडून देण्यात येणारे जी.एस.टी. अनुदान व महानगरपालिकेच्या स्वउत्पन्नातून भागविण्याचे असल्याने, ७ व्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करताना, संबंधित महानगरपालिकांनी त्यांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, निर्णय घेणे आवश्यक आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१६१५३७७१२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.08.02 16:24:56 +05'30'

(सं. श. गोखले)
शासनाचे सह सचिव

प्रत: -

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. महानगरपालिका (सर्व) (बृहन्मुंबई वगळून)
११. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (नवि-१४).